# एकेश्वरत्व
## एक निर्विवाद सत्य

लेखक
सय्यद अबुल आला मौदूदी

भाषांतर
जाहिद आबिद खान

'अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे.'

# मौलाना सय्यद अबुल आला मौदूदी

मौलाना सय्यद अबुल आला मौदूदी (१९०३ ते १९७९) प्रसिध्द विद्वान, नामवंत तत्त्वज्ञानी व उच्चकोटीचे लेखक होते. त्यांनी संपूर्ण मानव समाजापर्यंत इस्लामचा सत्य व सरळ संदेश पोहचविण्याकरिता संपूर्ण जीवन अर्पण केले व आपला दृष्टिकोन योजनाबध्दरीत्या कार्यान्वित करण्यासाठी जमाअत-ए-इस्लामी या संघटनेची १९४१ साली स्थापना केली. १९४१ पासून संपूर्ण एकाग्रतेने व आत्मीयतेने सदर संघटना इस्लामच्या तत्त्वांनुसार सतत कार्यरत आहे. इस्लामचा खरा अर्थ व उद्देश लोकांपर्यंत पोहचविण्याचे प्रयत्न करताना मौलानांना अनेक यातना सहन कराव्या लागल्या. बऱ्याच वेळा तुरुंगवास भोगावा लागला. १९५३ साली 'खत्म-ए-नबूवत' (अंतिम प्रेषितत्व) या विषयावर लिहिलेल्या पुस्तिकेच्या आरोपावरून त्यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली होती. मात्र ते कधीही भयभीत झाले नाही व माघारही घेतली नाही. नंतर त्यांची फाशीची शिक्षा रद्द करून त्याऐवजी जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली.

मौलानांनी इस्लामच्या प्रसार व प्रचारासाठी १०० हून अधिक पुस्तकें लिहिली आहेत. तफहीमुल कुरआन (६ खंड), अनेक लिखित व्याख्याने, अल जिहाद फिल इस्लाम, रिसाल-ए-दीनियात, तफहीमात (५ खंड), तन्कीहात, सीरत-ए-सरवरे आलम (स.) (दोन खंड), रसायल व मसाइल (५ खंड), खिलाफत व मुलुकियत, शहादत-ए-हक़, सलामती का रास्ता, इस्लाम का निज़ाम-ए-हयात, परदा, हुकूक-ए-ज़ौजेन, इत्यादी त्यांची बहुमोल साहित्यकृती आहे. जवळपास ४० भाषांमध्ये त्यांच्या पुस्तकांचे भाषांतर झाले आहे. इस्लामचे अत्यंत मार्मिक, बुध्दीला पटणारे व अत्यंत भारदस्त विवरण देण्याचे जे कौशल्य व अल्लाहदत्त क्षमता त्यांना प्राप्त होती, तिचा वेगळा परिचय करून देण्याची गरज नाही. त्यांच्या लेखणीच्या आश्चर्यजनक परिणामाने कितीतरी वृध्द, युवक, स्त्री-पुरुष व बालकांना इस्लामच्या ज्ञानाने चैतन्य प्राप्त झाले. एवढेच नव्हे तर श्रध्दाहीन स्वत: श्रध्दाळू होऊन इस्लामचे उत्तम प्रचारक झाले.

# प्रस्तावना

ही पुस्तिका इस्लाम धर्माचे विद्वान मौलाना मौदूदी यांच्या दोन भाषणांच्या आधारावर लिहिली गेली आहे. मौलानांनी यात एकेश्वरत्व व अनेकेश्वरत्व या विषयांवर आपले विचार मांडले आहेत. त्यांच्या वर्णनाने वाचकास एकेश्वरत्व व अनेकेश्वरत्व यातील फरक कळून येतो व त्या दोहोंतील वैशिष्ट्ये लक्षात येतात.

एकेश्वरत्व किती सार्थक व अनेकेश्वरत्व किती भयानक व दुष्परिणामी आहे, एकेश्वरत्व किती प्रकाशमय असून अनेकेश्वरत्व किती अंधकारमय आहे याचा अनुभव येतो. एकेश्वरत्वाने किती पवित्र व सुंदर समाज निर्माण होतो व अनेकेश्वरत्व किती नीतिहीन समाजास कारणीभूत ठरतो, हे उघड होते.

अल्लाह आम्हा सर्वांस अनेकेश्वरत्वापासून अलिप्त ठेवो व एकेश्वरत्वावर आमची श्रध्दा दृढ करो, अशी प्रार्थना करू या.

अख्तर हिजाजी

११ ऑगस्ट १९७७

## (भाग १)

सर्वश्रेष्ठ अल्लाहचे (ईश्वराचे) मानवावर इतके उपकार आहेत की, त्यांचा सुमार करता येणार नाही. त्याने आम्हास एकमेव अल्लाहचीच भक्ती करण्याची बुद्धी व केवळ एकाच सर्वश्रेष्ठ शक्तीची उपासना करण्याची समज दिली, याबद्दल आपण त्याचे उपकार मानायला हवे. ईशगुण, त्याचे अधिकार, त्याचे हक्क अल्लाहशिवाय इतर कोणासही प्राप्त नाहीत व त्याच्याशिवाय इतर कोणीही आराध्य नाही अशी श्रद्धा बाळगणे म्हणजे विवेक बुद्धीस मिळालेले सर्वश्रेष्ठ वरदान होय. याच विषयावर पुढे खुलासेवार चर्चा करण्यात आली आहे.

## मानव समाज व अनेकेश्वरत्व

'शिर्क' म्हणजे अनेकेश्वरत्व. यामुळे मानव समाज विभक्त होऊन माणसे एकमेकांपासून दुरावली जातात. अनेकेश्वरत्वी एक-दोन श्रद्धाशक्तीने संतुष्ट होत नाहीत. जगाच्या छोट्या छोट्या टापूत राहणारे अनेकेश्वरत्वी दोन-चार आराध्य शक्तींवर सहमती न दर्शविता प्रत्येक मानवी गट वेगळ्या श्रद्धाशक्तींची निवड करतो व त्याही कालानुरुप बदलत जातात. सारांश, अनेकेश्वरत्व मानवांना एकत्र येऊ देत नाही. मानवी समूह निरनिराळ्या जाती, जमाती, वंश, भाषा, वर्ण व देशांत विभागले जातात. त्यांच्या आपसातला विरोध, द्वेष व शत्रुत्वाचे रूप धारण करतो. एक समूह दुसऱ्या समूहास त्याच्या मानवी हक्कापासून वंचित करण्याचा प्रयत्न करू लागतो. सर्वत्र अन्याय व अत्याचाराचे वातावरण निर्माण होऊ लागते. जगात सर्वत्र रक्तपात व हिंसेच्या घटना घडू लागतात. युध्दाग्नी पेट घेतो व रक्ताचे पाट वाहू लागतात. जागतिक शांतता नष्टप्राय होते. बारकाईने अभ्यास केल्यास जगातील सर्वच युद्धांस अनेकेश्वरत्व या ना त्या स्वरुपात कारणीभूत ठरले आहे, असे दिसून येते. अनेकेश्वरत्वाच्या विवादामुळेच अनेकदा युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे, या सत्यास इतिहास साक्षी आहे.

## एकेश्वरत्वाने संघटित समाजाची निर्मिती होते

एकेश्वरत्वाने मानव समाज संघटित होतो. लोकांमध्ये एकता व जवळीक निर्माण होते. ते सर्व एकाच पालनकर्त्या अल्लाहची कृतज्ञतापूर्ण आराधना करण्यास एकत्र येतात. जेव्हा लोक अनेकेश्वरत्वापासून अलिप्त होऊन शुद्ध भावनेने एकाच सृजनकर्त्याला आराध्य मानून एकमेकांजवळ येतात, तेंव्हा निश्चितच एक सशक्त समाज निर्माण होतो. लोकांमध्ये एकतेची भावना जागृत होते. ते एकमेकांचे मित्र

बनतात व त्यांच्यात बंधुभाव निर्माण होतो. इतिहास साक्ष आहे की, एकेश्वरावरील श्रद्धेव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही भावनेने लोकांना एकत्रित करता आलेले नाही. अल्लाह विश्वव्यापी आहे व त्याच्याशिवाय इतर कोणीही आराध्य होऊ शकत नाही, हीच दृढ श्रद्धा सर्व मानवांना एकत्र आणू शकते. एकेश्वरत्व एका सशक्त समाजाची निर्मिती करू शकतो, हे एक निर्विवाद सत्य आहे. कधी कधी असेही निदर्शनास येते की, लोक एकेश्वराचे तत्त्व मान्य करतात, मात्र त्यांच्यात आपसात एकतेचा अभाव असतो, ते एकमेकांशी शत्रुत्वाने वागतात. याचे कारण असे की, त्यांच्यातील अनेकेश्वरत्वावरील श्रद्धा सुप्तावस्थेत अस्तित्वात असते.

सर्व मानवजातीस सर्व काळांत सदासर्वदा संघटित जीवन जगण्यासाठी एकेश्वरत्वाचा पाया मजबूत करून त्याचा अवलंब करणे आवश्यक आहे. त्यासाठी पोषक समाजव्यवस्था कायम करायला हवी.

## मानवासाठी ईशमार्गदर्शन

अल्लाहने पैगंबर मुहम्मद (स.) व कुरआनद्वारे मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांबाबत इतके परिपूर्ण मार्गदर्शन केले आहे की, मनुष्याला इतरत्र मार्गदर्शन शोधण्याची गरजच उरलेली नाही. ज्या लोकांना समाधानकारक मार्गदर्शन प्राप्त होत नाही, ते परिपूर्ण समाजव्यवस्था उभारू शकत नाहीत. ते परिस्थितीने विवश होऊन काही काळानंतर विखुरले जातात व त्यांची एकेश्वरावरील श्रद्धा खिळखिळी होऊन ते बहकले जातात. त्यांच्यात आपसात ताटातूट निर्माण होते. पैगंबर मुहम्मद (स.) व कुरआन यांच्याकडून त्यांना परिपूर्ण मार्गदर्शन प्राप्त होत राहिले तर कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही काळात त्यांच्यात विभाजन होण्याची शक्यता राहत नाही. मात्र लोकच जर अज्ञानी असतील किंवा मानसिक विकृतीमुळे ते स्वत:च उपलब्ध ज्ञानात आपल्या बुद्धिनुसार/इच्छेनुसार कमी जास्त फेरबदल घडवून आणत असतील व त्यालाच योग्य मानण्याचा दुराग्रह करीत असतील, तर ते निश्चित बहकले जातील व मार्गभ्रष्ट होतील.

## मनुष्य केवळ पालनकर्त्या अल्लाहस उत्तरदायी आहे

एकेश्वरावर लोकांची अढळ श्रद्धा कायम राहावी, त्यांचे मनोबल स्थिर राहावे व त्यांनी सरळ मार्गाचा अवलंब करावा यासाठी त्यांच्या ठायी विश्वास निर्माण करायला हवा की, मरणोपरांत त्यांच्या कर्मांची पडताळणी व हिशोब केवळ अल्लाहच करणार आहे. अल्लाहच मनुष्याचा भाग्यविधाता आहे व तोच मरणोपरांत जगाच्या अंतानंतर

मानवास त्याच्या कर्मानुसार मोबदला देणार आहे, अर्थात स्वर्ग वा नरकात प्रवेशाचा आदेश देणार आहे. अल्लाहशिवाय दुसरा कोणीही त्याच्या पुण्य व पापकृत्यांचा मरणोपरांत हिशोब घेणार नाही व मरणोपरांत मिळणारे सुखद वा दुःखदायी अनंतकालीन जीवन अल्लाहच प्रदान करणार आहे. या तत्त्वांवर दृढ विश्वास निर्माण झाल्यास मनुष्य सदाचाराचा मार्ग स्वीकारेल व समाज संघटितपणे जीवन व्यतीत करील. मात्र जे लोक अल्लाहव्यतिरिक्त इतर शक्तीसुद्धा या त्यांच्या ऐहिक गरजा व मनोकामना पूर्णत्वास नेऊ शकतात व जगाच्या अंतानंतर न्यायनिवाड्याच्या दिवशीही ते साहाय्यक सिद्ध होऊ शकतील, असा विश्वास बाळगतात, ते निश्चितच मार्गभ्रष्ट आहेत असे मानायला हवे.

## एकेश्वरत्वाची उच्चतम प्राप्ती

सामाजिक एकता सबळ व दीर्घकालापर्यंत अस्तित्वात राहावी म्हणून अल्लाहाने काही कर्तव्ये माणसाकरिता अनिवार्य केली आहेत. पहिले (अनिवार्य) कर्तव्य म्हणजे नमाज. जगातील सर्व मुस्लिमांनी दिवसातून पाच वेळा नमाज अदा करायला हवी. जगाच्या पाठीवर कुठेही निवास करणाऱ्या मुस्लिमाने पश्चिमाभिमुख (किबलाकडे तोंड करून) होऊन नमाज अदा करावी, असा आदेश आहे. काबागृह हे केंद्र आहे व जगातील सर्व मुस्लिम त्याच दिशेकडे तोंड करून उभे राहतात. कंबरेपर्यंत वाकतात (रुकू करतात), नतमस्तक होतात (सजदा करतात) व गुडघ्यावर बसतात (कायद्यात बसतात). संपूर्ण जगातील बहुतांश मुस्लिम दिवसातून पाच वेळा नियमितपणे नमाज अदा करतात. एकतेचे हे मनोहारी दृश्य इस्लामशिवाय इतर कोणत्याही धर्मात वा पंथात पाहायला मिळत नाही. पाचही वेळा मुस्लिमांनी शिस्तबद्ध पद्धतीने एका ओळीत उभे राहून एकत्रितपणे नमाज अदा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र तो जर एकटा असेल तर त्यास एकटे नमाज पढण्याची मुभा आहे. मात्र एकत्रितपणे एका इमामाच्या पाठीमागे शिस्तबद्धपणे उभे राहून नमाज पढण्यास अधिक प्राधान्य देण्यात येते. म्हणून दोन मुस्लिमांना नमाज अदा करावयाची असल्यास, तिला एकतेचे स्वरुप देण्याकरिता एकाने नमाजाचे नेतृत्व करावे (इमामत करावी) व दुसऱ्याने मागे (बाजूला) उभे राहून त्याचे अनुकरण करावे, असे आदेश देण्यात आले आहेत.

## अल्लाहच्या दासांचे विश्वबंधुत्व

नमाजसाठी मुस्लिमांना हाक देण्याची एक विशिष्ट पद्धत आहे. अशी पद्धत जगातील कोणत्याच धर्मीय वा निधर्मी समाजात प्रचलित नाही.

नमाजसाठी हाक देण्याचा एकाच प्रकारचा शब्दसमूह (अजान) जगातील प्रत्येक मशीदीतून दिवसातून पाच वेळा पुकारला जातो. 'अजान' देणाऱ्याची व ज्यांना बोलाविण्यात येत आहे त्यांची मातृभाषा कोणतीही असो, 'अजान' अरबी भाषेतच पुकारली जाते. जगातील कोणत्याही भागातील मुस्लिमास 'अजान' ऐकताच नमाजकरिता हाक दिली जात आहे असे समजते. अज़ानने हेही लक्षात येते की, त्यांना (अर्थात सर्व इस्लाम धर्मियांना) कोठे बोलाविले जात आहे?

अजान केवळ नमाजसाठी दिलेली हाक नसून इस्लामच्या मूलतत्त्वांचे जाहीर प्रकटन आहे. 'अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे, त्याच्याशिवाय कोणीही ईश्वर नाही, मुहम्मद (स.) अल्लाहचे प्रेषित आहेत, नमाज (अदा करण्या) साठी या, (ईशभक्तीने) कल्याण व सफलता प्राप्त करा,' हा अजानचा संक्षिप्त अर्थ आहे. लोकांना बोलविण्याकरिता यापेक्षा चांगली उद्घोषणा होऊच शकत नाही. याच हाकेला प्रतिसाद म्हणून मुस्लिम बांधव सर्व कामकाज सोडून मशीदीकडे धाव घेतात व दिवसातून पाच वेळा शिस्तबद्धपणे एकत्रित नमाज अदा करतात.

## नमाज

नमाजची वेळ, नमाज अदा करण्याची पद्धत व नमाजमध्ये जे पठण करायचे, ते जगात सर्वत्र एकाच प्रकारचे असून काही बाबतीत नाममात्र फरक वगळता, जगातील सर्वच देशांतील मुस्लिमांच्या नमाजमध्ये कोणताच विशेष फरक आढळून येत नाही. त्यामुळे जगातील मुस्लिमांत ईशभक्तीची भावना सतत जागृत ठेवली जाते आणि एकता व विश्वबंधुत्वाची भावना सतत तेवत राहाते.

## रोजा

'रोजा' (म्हणजेच उपवास) अशाच सामूहिकतेच्या स्वरुपात पाळला जातो. रोजाबाबतही विशिष्ट काळ, वेळापत्रक व अटी-शर्ती निश्चित करण्यात आल्या आहेत. रोजे ठेवण्याकरिता रमजानचा महिना निश्चित करण्यात आला आहे. उद्देश हाच की, सर्व मुस्लिमांनी एकाच वेळी रोजाचे पालन करावे. रोजा सुरु होण्याची व संपण्याची वेळही निश्चित करण्यात आली आहे, जेणेकरून सर्वांचा रोजा एकाच वेळी सुरू होऊन एकाच वेळी पूर्ण व्हावा. रोजाबाबतचे आदेशही समसमान देण्यात आले आहेत. त्यामुळे साऱ्या मुस्लिमांना आयुष्यभर दरवर्षी रमजान महिन्याचे ३० (किंवा २९) दिवसांचे रोजे एकाच पद्धतीने, एकाच प्रकारच्या बंधनानुसार पूर्ण करायचे असतात. या

पद्धतीमुळे जगातील सर्व मुस्लिमांमध्ये ते समान धार्मिक तत्त्वाचे पालन करीत आहेत, अशी एकतेची दृढ मानसिकता निर्माण होते. याशिवाय संपूर्ण जगात रमजान महिन्याच्या प्रत्येक रात्री (पाच वेळेच्या नमाजव्यतिरिक्त) तरावीहची नमाज एकत्रितरीत्या अदा केली जाते व तरावीहच्या नमाजमध्ये संपूर्ण कुरआनचे पठण केले जाते. अशा तऱ्हेने तरावीह प्रार्थनाही आहे व कुरआनचा प्रचार व पठणही आहे. त्यामुळे मुस्लिमांमध्ये धार्मिक चेतना निर्माण होते. दरवर्षी संपूर्ण कुरआनचे श्रवण करणाऱ्यांची भाषा अरबी असो वा नसो, त्यांना त्याचा अर्थ समजो वा न समजो, ते सर्वच्या सर्व एकाच (धर्म) ग्रंथावर श्रद्धा ठेवणारे आहेत व कुरआन निश्चितच ईशग्रंथ आहे, असा विश्वास त्या सर्वांच्या मनात दृढ होतो.

## हज

इस्लाम धर्मियांच्या हज या धार्मिक विधीमुळे इस्लामच्या विश्वव्यापी सामाजिकतेचे अनुपम दर्शन घडते. जगातील प्रत्येक सधन मुस्लिम व्यक्तीला हज अनिवार्य करण्यात आले आहे व हे कर्तव्य (अनिवार्य) वर्षातील विशिष्ट तारखांना पार पाडले जाते. या तारखांच्या काळातच जगातील ज्या ज्या भागात सधन मुस्लिम राहतात, ते मक्का (सऊदी अरेबिया) येथे एकत्र येतात. हजनिमित्ताने जगाच्या विविध भागांतून सामान्य सधन मुस्लिम फार मोठ्या संख्येने एकत्र येतात. यू.एन.ओ. (संयुक्त राष्ट्रसंघा) च्या सभेला केवळ राजकीय मुत्सद्दी लोक प्रतिनिधित्व करतात. जागतिक चर्चासत्रात केवळ राजकीय पुढारी भाग घेतात, मात्र हजनिमित्ताने जगाच्या सर्व देशांतील मुस्लिम लाखोंच्या संख्येने डेरेदाखल होतात. एका सर्वशक्तिमान अल्लाहची एकत्र आराधना करणे, हाच त्यांचा एकमात्र उद्देश असतो. ते सर्व काबागृहाला प्रदक्षिणा घालतात. एकत्र मक्केहून मीना येथे जातात. तेथून ते अरफातला प्रस्थान करतात. अरफातहून मुजदल्फा व मुजदल्फाहून मीनाकडे परतीचा प्रवास करतात. एकाच वेळी जनावरांचे बळी देतात, एकत्रितरीत्या सैतानाला दगडाचे तुकडे फेकून मारतात. मीना व अरफातमध्ये एकत्र विश्राम करतात. एकाच (अरबी) भाषेत 'लब्बैक' च्या घोषणा देतात. एकाच वेळी काबागृहात चौतर्फा नमाज पढतात. याच काबागृहाच्या दिशेने जगातील सर्व मुस्लिम दिवसातून पाच वेळा नमाज अदा करतात. त्या लोकांत जगातील सर्व वंशांच्या, वर्णांच्या, भाषांच्या व देशांच्या रहिवाशांचा समावेश असतो. सर्व लोक विविध प्रकारचे पोषाख धारण करतात, त्यात गरीब, श्रीमंत, राजे-महाराजे आणि दीन-हीन भिकारीही असतात. इतका विषम जनसमुदाय

असूनही त्यांच्यात समतेचे अतुलनीय दृश्य पाहायला मिळते. काबागृहाच्या हद्दीत पोहचताच सर्व हाजी आपले खाजगी वेष काढून एकाच प्रकारचा अत्यंत शुभ्र व साधा वेष परिधान करतात. त्यांच्याकडे पाहिल्यानंतर ते कोणत्या देशाचे रहिवासी आहेत व त्यांचा सामाजिक दर्जा काय आहे, हे मुळीच लक्षात येत नाही. उच्च दर्जाच्या माणसाला, साधारण माणसाच्या पंक्तीत आणले जाते. अत्यंत सुसंस्कृत व श्रीमंत व्यक्तीस साधारण व्यक्तीची दशा प्राप्त होते. काबा मस्जिदीस प्रदक्षिणा घालताना गरीब व श्रीमंत, गोऱ्या व काळ्यामध्ये कोणताच फरक केला जात नाही. काबागृहाच्या आवारात पोहचल्यानंतर माणसातला अहं नष्ट होतो व स्वत:च्या श्रेष्ठत्वाची जाणीव लुप्त होते व त्यांच्यातला वंश, वर्ण, भाषा व देशाचा भेदभाव कायमस्वरुपी नष्ट होतो. जगातील कोणत्याच धार्मिक वा निधर्मी जनसमूहाकडे मानवी भेदभाव संपुष्टात आणून समतेची भावना जागृत करणारा व सतत दरवर्षी ती प्रक्रिया चालू ठेवणारा असा कोणताच चमत्कारिक मार्ग वा उपाय उपलब्ध नाही. हा ईशआदेशाचा चमत्कार आहे, सर्वशक्तिमान अल्लाहच्या एकत्वावर श्रद्धा ठेवून त्याच्या प्रेषिताचे उपदेश व कुरआनातील आदेशानुसार जीवन व्यतीत करण्याचा निश्चय करणारे श्रद्धाळू मुस्लिम एक सशक्त समाजाचे रुप धारण करतात.

## ईदुज्जुहा (बकर ईद)

अल्लाहचे उपकार मानायला हवे की, त्याने हजचे पुण्यकार्य व पवित्र वातावरण काबा या इस्लामच्या केंद्रस्थानापर्यंतच सीमित न ठेवता जगातील सर्वच मुस्लिमांना त्यात सामील करून घेतले आहे. जगात विविध स्थानी वास्तव्य करून राहणाऱ्या मुस्लिमांनासुद्धा हजच्या दिवसांत हजच्या प्रक्रियेत सामील होण्याचे प्रावधान करण्यात आले आहे. बकर ईद (ईदुज्जुहा) च्या तीन दिवसांत सामूहिक नमाज व जनावरांचे बळी देण्याची प्रथा त्याच प्रक्रियेतला भाग आहे.

जगातील सर्व मुस्लिम बांधवांना आदेश देण्यात आले आहेत की, हिजरी सनाच्या ९ जिल्हज्ज या तारखेला जेव्हा हाजी 'मीना' या स्थानापासून अरफातला रवाना होतात, त्याच दिवसाच्या सकाळपासून प्रत्येक फर्ज (अनिवार्य) नमाजनंतर उच्च आवाजात 'अल्लाहु अकबर, अल्लाहु अकबर, ला इलाह इल्लल्लाहा वल्लाहु अकबर, अल्लाहु अकबर व लिल्लाहिल हम्द' ची उद्‌घोषणा करण्यास सुरुवात होते. या घोषणा सतत चार दिवसांपर्यंत चालू ठेवाव्यात. कारण हज करणाऱ्यांचा या चार दिवसांचा काळ 'मीना' या भागात व्यतीत होतो. ईदुज्जुहाची नमाज इस्लामी महिना जिल्हजच्या

दहा तारखेला आयोजित केली जाते, कारण हाजी त्या दिवशी कुरबानीचा (बलिदानाचा) दिवस साजरा करीत असतात. ईदच्या नमाजला जाताना व परत येताना याच घोषणा देत जावे, असे मुस्लिमांना सांगण्यात आले आहे. साऱ्या जगातील सधन मुस्लिम ईदच्या नमाजनंतर 'मीना' येथील हाजीप्रमाणे आपापल्या गावात कुरबानीचा कार्यक्रम करतात. अशा तऱ्हेने जगातील सर्व मुस्लिमांना तेसुद्धा हजच्या पुण्यकार्यात सहभागी असल्याचे समाधान प्राप्त होते. हजच्या मैदानावर एकत्र झालेल्या जनसमुदायाइतका विशाल समूह जगातील प्रत्येक गावात बकर ईदच्या दिवशी एकत्र येत नाही. तरीही आपापल्या गावात वा शहरात शक्य तितका मोठा जनसमूह ईदची नमाज अदा करतो व जागतिक पातळीवर बकरईद साजरी केली जाते. हे मुस्लिमांचे सामूहिक एकतेचे खुले प्रदर्शन सिद्ध होते.

## 'एकेश्वरत्व' परिपूर्ण जीवनव्यवस्थेचा पाया आहे

उपरोक्त संक्षिप्त वर्णनाने हे सिद्ध होते की, एकेश्वरत्व, प्रेषितत्व, पवित्र ग्रंथ कुरआन व मरणोत्तर जीवन या ईशदत्त तत्त्वांच्या आधारे, जगातील लोकांना देश, समाज, वंश, वर्ण, भाषा इत्यादी बाबींनी निर्माण होणारे भेदभाव विसरून, एक जागतिक समाज निर्माण करता येतो. इस्लामने ईशआराधनेच्या ज्या पध्दती प्रदान केल्या आहेत, त्यांचा स्वीकार केल्यास समाजात निश्चितच एकतेचे वातावरण निर्माण होते. अल्लाहने अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) व अंतिम ग्रंथ कुरआनद्वारे सर्व मानव समाजाला अशी परिपूर्ण जीवन व्यवस्था प्रदान केली आहे की, मानवाला कोणत्याही काळात व कोणत्याही स्थळी आपल्या कोणत्याही समस्येचे समाधान करण्यासाठी इतरत्र कोणतेच मार्गदर्शन प्राप्त करण्याची निश्चितच गरज भासणार नाही.

## मग सत्याचा इन्कार का?

ही अतिशय दुर्दैवाची व शरमेची बाब आहे की, ज्या जनसमूहाला अल्लाहने इतका परिपूर्ण व सर्वंकष जीवनमार्ग दिला होता आणि समता व सामाजिक एकता स्थापित करण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी सोपविली होती, तसेच इस्लामचा प्रसार करून संपूर्ण मानव समाजास एकत्रित आणण्याचे कार्य दिले होते, तोच जनसमूह त्याला सोपविलेल्या कर्तव्यांची पायमल्ली करून आपल्या एकतेला छिन्न-विच्छिन्न करण्याचे दुष्कर्म करीत आहे. जगातून उच्चनीच, स्पृश्यास्पृश्यता, परस्पर द्वेष व तिरस्काराची तुच्छ भावना नष्ट करून पृथ्वीवरील अन्याय व अत्याचाराचे वातावरण

संपुष्टात आणावे, अशी त्यांच्याकडून अपेक्षा बाळगण्यात आली होती. अल्लाहाच्या एकत्वाच्या सत्य मार्गाचा अवलंब करून लोकांत विश्वबंधुत्वाची भावना जागृत करावी, असे कार्य त्यांना सोपविण्यात आले होते, जेणेकरून जुलुमाऐवजी न्याय, युध्दाऐवजी शांती, द्वेष व शत्रुत्वाऐवजी हितचिंतन व आपुलकीचे वातावरण निर्माण व्हावे व त्यांनीही पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यासारखे दयावान व कृपाळू–करुणामय सिध्द व्हावे असे अपेक्षित आहे.

## असे घडण्याचे कारण काय?

बऱ्याच लोकांनी एकेश्वरत्व, दीन (जीवनशैली) व ईशआदेशानुसार अस्तित्वात आलेल्या कायदा व नियमांमध्ये नवनवे विचार समाविष्ट केले आहेत. इस्लामच्या तत्त्वांमध्ये काही नवीन बाबींचा समावेश केला गेला आहे, तर काही नियमांची काटछाट करण्यात आली आहे. ज्या गोष्टी महत्त्वाच्या नव्हत्या, त्यांना अवास्तव महत्त्व देण्यात आले आहे व ज्या अत्यंत महत्त्वाच्या होत्या, त्यांना गौण स्थान देण्यात आले आहे. याच फेरबदलास (म्हणजे वाढ व काटछाटेस) सत्य मानण्यात येत आहे. याच कारणामुळे मुस्लिम समाज अनेक विरोधी गटांत विभागला गेला आहे. इस्लामी ज्ञानापासून वंचित असलेल्यांना इस्लामचा संदेश देण्याचे काम तर बाजूस राहिले, खुद्द मस्लिमांना दिशाहीन करण्याच्या कामास पुण्यकार्य समजण्यात येत आहे. या विचित्र स्थितीने मुस्लिमांची अवस्था हास्यास्पद झाली आहे व इस्लामवर टीका करणाऱ्यांना नामी संधी प्राप्त झाली आहे. त्यांच्या मतानुसार मुस्लिमांचा स्वतंत्र समाज मुळी अस्तित्वातच नाही. मुस्लिमांची वर उल्लेखित सद्यस्थिती इस्लामच्या प्रसाराच्या मार्गातील सर्वांत मोठा अडसर आहे. अल्लाह दया करो व आम्हास सरळ मार्गाचा अवलंब करण्याची बुध्दी प्राप्त होवो.

## (भाग २)

जगातील लोक कोणत्या न कोणत्या धर्माचा स्वीकार करतात, मात्र त्यांना विश्वनिर्मात्याबाबत योग्य ते ज्ञान प्राप्त नसते व त्यांच्या आराधनेचा मार्गही योग्य नसतो. इस्लामच असा एकमेव धर्म आहे जो विश्व व मानवजातीची निर्मिती करणाऱ्या अल्लाहचे खरे स्वरुप एकेश्वरत्वाद्वारे प्रस्तुत करतो. इस्लाम योग्य ते आचरणाचे पाठ देतो. त्यामुळे मुस्लिमांना जगात विशेष स्थान प्राप्त होते. मुस्लिम केवळ एकाच सर्वशक्तिमान अल्लाहची उपासना करतात. म्हणूनच त्यांची समाजात वेगळीच छाप पडते. मात्र ही अत्यंत विचित्र व खेदजनक बाब आहे की, मुस्लिम आपल्या विशेष सामाजिक स्थानाकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यांनी स्वत:ला फार मोठ्या ईशकृपेपासून वंचित करून घेतले आहे. एकेश्वरत्व समजून घेणे व आपल्या अपत्यांना समजावून देऊन त्यांचे मन एकेश्वरत्वाच्या ज्ञानाने प्रकाशित करणे अत्यंत आवश्यक आहे. जोपर्यंत हे मौलिक ज्ञान प्राप्त होत नाही, इतर कोणत्याच उपायाने मानवी आचार-विचार सुधारणार नाहीत.

### एकेश्वरत्व आहे तरी काय?

'तौहीद' म्हणजे केवळ अल्लाहचे अस्तित्व मान्य करणे असा अर्थ होत नाही. जगात असा कोणताच समाज नव्हता व आजही नाही जो अल्लाहच्या अस्तित्वाचा इन्कार करतो. जगात फार पूर्वीपासून नास्तिक अस्तित्वात आहेत. रशियाचे नास्तिकत्व तर सर्वांना माहीतच आहे. पण रशियाचे नास्तिक शासक एक पंचमांश नागरिकांनासुद्धा अल्लाहच्या अस्तित्वाचा इन्कार करण्यास राजी करू शकले नाहीत. आश्चर्य म्हणजे ते गेले चाळीस-पन्नास वर्षे नास्तिकतेचा प्रचार करीत आहेत व या प्रचारासाठी शक्ती व संपत्तीचा बेछूट व्यय करीत आहेत. गंमतीची गोष्ट अशी की, मागच्या जागतिक युध्दात जेव्हा जर्मन फौजा विजयी होत रशियात शिरु लागल्या तेव्हा स्टालिनने स्वत: जनतेस आवाहन केले की, मस्जिद व चर्चमध्ये जाऊन अल्लाहची प्रार्थना करा की, त्याने आमची रक्षा करावी. याचाच अर्थ असा की, जे लोक अल्लाहच्या अस्तित्वाचा इन्कार करतात, तेच वेळ पडल्यास अल्लाहसमोर हात पसरून दयेची याचना करतात. सारांश मानव कधीही अल्लाहच्या अस्तित्वाचा इन्कार करू शकला नाही आणि करु शकणार नाही.

'तौहीद' (एकेश्वरत्व) म्हणजे एकमेव अल्लाहचीच बंदगी (उपासना) करणे असे होते. जगातील कोणताही समाज सर्व शक्तींना (आराध्यांना) ईश्वर मानत नाही.

भारतातील अनेकेश्वरत्वी परमात्मा हाच ईश्वर आहे असे मानतात. भूतकालीन झरतुष्ट्री (इराणी अग्निपूजक) ईश्वर एक आहे असे मानत असत. कुरआन मक्कावासी अश्रध्दावंताना विचारतो की, त्यांना कोणी जन्म दिला? ते उत्तर देतात 'अल्लाहाने!' त्यांना पुन्हा विचारले जाते की, धरती व आकाश कोणी निर्माण केले? ते पुन्हा म्हणतात, 'अल्लाहाने!' पुरातन कालापासून आजपर्यंत माणूस दिशाभूल करणाऱ्यांमुळे गोंधळला गेला आहे. सर्वांना माहीत आहे की, 'ईश्वर एक आहे', तरीही ते अनेक शक्तींची (ईश्वरांची) पूजा करण्याची चूक करीत असतात.

## अनेकेश्वरत्वाचे प्रकार

कुरआनचे अध्ययन केल्यास लक्षात येते की, अल्लाह जो विश्वाचा निर्माता, मार्गदर्शक व सर्वांचा पालनकर्ता आहे, केवळ तोच ईश्वर आहे, या तत्त्वाची पुन्हा पुन्हा जाणीव करून देण्यात आली आहे. हीच बाब मानवी मनावर बिंबविण्याचे आटोकाट प्रयत्न करण्यात आले आहेत. कुरआनने अल्लाहचे अस्तित्व पटवून देण्यापेक्षा तोच सर्वांचा पालनकर्ता असून केवळ तोच ईश्वर आहे या तत्त्वाची पुष्टी केली आहे. नास्तिकतेबाबत कुरआनात विशेष चर्चा नाही, मात्र अनेकेश्वरत्वाचे अनेक आयतींद्वारा खंडन करण्यात आले आहे. अल्लाहसह इतरांनाही ईश्वर मानण्यासंदर्भात लोक चार प्रकारच्या चुका करतात. (१) अल्लाहसोबत इतरांची आराधना करणे. (२) ईशगुण इतरांना प्राप्त असल्याबाबत श्रद्धा बाळगणे. (३) अल्लाहसमान इतरांनाही शक्ती वा सामर्थ्य प्राप्त असते, अशी श्रद्धा बाळगणे. (४) अल्लाहचे हक्क इतरांना बहाल करणे.

१) अल्लाहसोबत इतरांना आराध्य मानण्याचे ठळक उदाहरण द्यायचे झाल्यास ख्रिस्ती धर्मीयांचा उल्लेख करता येईल. ते येशु ख्रिस्तांना अल्लाह-पुत्र मानतात. अल्लाह कोणत्याही सजीव प्राण्याचे रुप घेऊन अवतार धारण करतो, ही कल्पनाच मुळी फोल आहे. अल्लाह जो संपूर्ण विश्वाचा सृजनकर्ता आहे, तो एका माणसाचे रूप धारण करील, ही बुद्धीस न पटणारी बाब आहे. अल्लाहचा पुत्र मानणे म्हणजे माणसाला अल्लाहचा दर्जा देण्याचा अनेकेश्वरत्वी दृष्टीकोन आहे. अशाच प्रकारे अनेकेश्वरत्वी देवदूतांना अल्लाहच्या मुली मानतात. राम हा अल्लाहचा अवतार होता असे, मानणेही अनेकेश्वरत्वी श्रध्देचे उदाहरण आहे.

२) ईशगुण इतरांनाही प्राप्त असतात असे मानणे हाही अनेकेश्वरत्वाचा प्रकार आहे. अल्लाह संपूर्ण विश्वातील प्रत्येकाचे म्हणणे ऐकत असतो. अल्लाहला संपूर्ण

विश्वातल्या सर्व गोष्टींचे ज्ञान प्राप्त आहे. जगाच्या पाठीवरून कोणत्याही कानाकोपऱ्यातून दिलेली आरोळी त्यास ऐकू येते. तो एकाच समयी सर्वकाही बघू शकतो. अल्लाह सर्वकाही एकाच वेळी पाहू शकतो, ऐकू शकतो, समजू शकतो, अशा प्रकारे दुसऱ्या शक्ती वा व्यक्तींनाही पाहता येते, ऐकता येते, सर्वकाही समजते असे मानणे म्हणजे एकेश्वरत्वास नाकारणे होय. एखादी व्यक्ती बिछाण्यावर पडल्या पडल्या एखाद्या महापुरुषाला (संत-साधूला) मदतीकरिता हाक देत असेल, तर ईशगुण त्या महात्म्यासही प्राप्त आहे असे तो समजत आहे, असा अर्थ निघतो.

३) अशाच तऱ्हेने जे अधिकार अल्लाहस प्राप्त आहेत ते मानवासही प्राप्त आहेत, असे मानणे म्हणजे मानवाची अल्लाहशी बरोबरी करणे मानले जाईल. अल्लाह सर्व प्राण्यांचा भाग्यविधाता आहे. अल्लाहने मनुष्याला जे काही दिले आहे त्यात कोणीही कमी-जास्त फरक करू शकत नाही. अल्लाहच्या इच्छेविरुद्ध कोणीही कोणास ठार करू शकत नाही व अल्लाह एखाद्याला ठार करू इच्छित असेल तर त्याला जगातल्या सर्व शक्ती एकत्र येऊनही वाचवू शकत नाहीत. माणसाने अल्लाहचे अधिकार इतर शक्तींनासुद्धा प्राप्त आहेत, असा विश्वास बाळगणे फार मोठी चूक आहे. ईशगुण इतरांनाही प्राप्त असतात, अल्लाह इतर सजीवांचे रूप धारण करतो, अल्लाहचे अधिकार इतर शक्तींनाही प्राप्त असतात या धारणे वा श्रध्देमुळेच माणसे अनेकेश्वरत्वी होऊन ईश्वरेतरांची पूजा-अर्चा वा उपासना करण्याची चूक करतात. मनुष्य त्याच शक्ती वा व्यक्तीची उपासना करतो जिच्यापासून त्याचे भाग्य निश्चित होण्याची त्याला शक्यता वाटते. जर त्याच्या मनात दृढ विश्वास असेल की, अल्लाहव्यतिरिक्त इतर कोणत्याच शक्तीला अल्लाहसारखे सामर्थ्य व अधिकार प्राप्त नाही तर तो अनेकेश्वरत्वाकडे वळणार नाही.

४) उपरोक्त तिन्ही कारणांमुळे मनुष्य अनेकेश्वरत्वाकडे वळतो. माणसांनी अल्लाहची उपासना करायला हवी, त्याच्यासमोर नतमस्तक व्हायला हवे, पण चुकीच्या धारणांमुळे तो इतरांची उपासना करू लागतो. कुरआनच्या शिकवणीनुसार, अल्लाहव्यतिरिक्त दुसरा कोणीच ईश्वर वा उपास्य होऊ शकत नाही. अल्लाह सर्वकाही ऐकतो, सर्वकाही पाहतो, तो सर्वज्ञ आहे व तोच सर्वशक्तिमान आहे, तोच प्रार्थना ऐकू शकतो, प्रार्थना मान्य करू शकतो. म्हणून त्याचे दासत्व स्वीकार करायला हवे. त्याचीच उपासना करायला हवी. कुरआनात बऱ्याच वेळा याच बाबींचा उल्लेख केला गेला आहे. उद्देश्य हाच की, मनुष्याने अल्लाहशिवाय दुसऱ्या कोणासही पूज्य (आराध्य) मानू नये.

ज्याप्रमाणे आराध्याच्या बाबतीत माणूस चूक करतो, तसाच तो पालनकर्त्याच्या बाबतीतही चूक करतो. 'रब' म्हणजे पालनकर्ता. 'इलाहा' व 'रब' (आराध्य व पालनकर्ता) या दोन्ही संज्ञाच्या बाबतीत मानवाने चुकीच्या धारणा निर्माण करून अल्लाहनिर्मित व अल्लाहद्वारेच अस्तित्वात असलेल्या सजीव व निर्जीवांना उपास्य मानले आहे.

## पालनकर्त्याबाबत चुकीचा समज

लोक समजतात अल्लाहव्यतिरिक्त इतरही शक्ती अन्नपुरवठा करतात, पालनपोषण करतात, आरोग्य व सुदृढ देहयष्टी देतात, म्हणून ते त्यांची उपासना करू लागलेत. मानवाने पालनकर्त्या अल्लाहचे पालनपोषणाचे श्रेय इतरांशी निगडीत केले, कारण ते त्यांना अनन्यसाधारण शक्ती व सामर्थ्यांचे धनी वाटतात. काही लोकांना देवदूत तर काहींना माणसे, काहींना ग्रह तर काहींना नक्षत्रे, जनावरे, वृक्ष मानवाचे हितकर्ते व मानवाच्या गरजा पुरविणारे वाटतात. काही तर माणसांनाच माणसाचे पालनकर्ते मानतात. सम्राट नमरुद इराकचा शासक होता, सर्व शक्ती त्याच्या हातात एकवटली होती. म्हणून तो स्वत:ला तेथील जनतेचा पालनकर्ता समजू लागला. म्हणून इब्राहीम (अ.) यांनी त्यास म्हटले की, माझा पालनकर्ता जीवनदाता आहे व जीवनाचा अंतही करणारा आहे. नमरुद उत्तरला, ''मीही ज्याला हवे त्याला जीवित ठेवतो व नको असेल त्याला मारून टाकतो.'' मग इब्राहीम (अ.) यांनी सांगितले, ''माझा अल्लाह पूर्वेकडून सूर्याचा उदय करतो, तू असे कर की सूर्योदय पश्चिमेकडून करून दाखव.'' नकारवादी नमरुद निरुत्तर झाला. त्याला ठाऊक होते की, तो स्वत: जगाचा पालनकर्ता नाही. तरीही त्याने लोकांचा पालनकर्ता असण्याचा हट्ट सोडला नाही.

याचप्रमाणे किंग फारोह (फिरऔन) ची कथा आहे. फारोहने जाहीर केले होते की, तो सर्वांत मोठा पालनकर्ता आहे. कारण त्याचे संपूर्ण इजिप्तवर वर्चस्व होते. मात्र एकेश्वरत्वात पालनकर्त्याचा सहकारी किंवा भागीदार नसतो, म्हणून कुरआनात अल्लाहस बऱ्याच ठिकाणी 'पालनकर्ता' संबोधिले गेले आहे. उद्देश हाच की, मानवाच्या मनावर ही बाब खोलवर रुजविली जावी की, अल्लाहच सर्वांचा पालनकर्ता व आराध्य आहे व त्याच्याव्यतिरिक्त साऱ्या मानवजातीचा इतर कोणीही पालनकर्ता नाही व आराधनेस पात्रही नाही. निश्चितच याच दृढ श्रद्धाभावनेने संपूर्ण मानवजातीचे कल्याण व उत्कर्ष साधता येईल.

-०- समाप्त -०-